# प्रकरण तिसरे

## " सौ. शांताबाई कांबळे यांच्या जीवनाची जडण-घडण ---

## प्रकरण - तीन

## सौ.शांताबाई कांबळे यांच्या जीवनाची जडण-घडण ---

`माज्या जल्माची चित्तरकथा` हे आत्मकथन म्हणजे शांताबाई कांबळे यांची जीवन कहाणी आहे.`पूर्वा` मासिकातून सन १९८२-८३ साली क्रमश: प्रसिध्द झालेले हे दलित स्त्री चे पहिलेच आत्मकथन असल्याने या आत्मकथनास पहिलेपणाचा मान मिळालेला आहे. यामध्ये शांताबाईंना लहानपणी शाळेत घातल्यापासून ते १९८१ पर्यन्त शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून निवृत्त होईपर्यन्तचा काळ आला आहे. शांताबाईंचे हे आत्मकथन म्हणजे प्रथमच शिक्षणाची संधी मिळालेल्या दलित स्त्री च्या संघर्षमिय जीवनाची कहाणी आहे. स्वजीवनाची कहाणी सांगत असतानाच तत्कालीन सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक घटकावर प्रकाश झोत टाकलेला आहे. यामध्ये स्वत:च्या जीवनाचा आत्मशोध घेता घेता तत्कालीन समाज मनाचा विचारही केल्याने या आत्मकथनाची व्याप्ती वैयक्तिकतेपासून सामाजिकतेपर्यन्त पोहोचलेली आहे. अस्पृश्यता आणि दारिद्र्य हे दुहेरी दु:खभोग ज्या समाज व्यवस्थेने दलिताना दिले ते भोग वेशीवर टांगण्याचा प्रयत्न इतर आत्मकथनकाराप्रमाणे शांताबाईंनी सुध्दा केलेला आहे. स्वत:च्या कर्तबगारीवर शिक्षिका, पुढे मुख्याध्यापिका बनून अनेक शाळा आदर्श बनविल्या. या कष्टाचे फळ म्हणूनच त्यांची शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नेमणूक झाली. अनेक लोकांच्याकडून गौरव झाला, आणि शेवटी अधिकारी म्हणून निवृत्त झाल्या असे हे समृध्दीचे जीवन त्यांच्या वाट्याला आले. म्हणूनच `केवळ दलित म्हणून नव्हे तर ज्या काळात एकूणच स्त्रिया फारशा शिक्षित नव्हत्या व त्यातही दलित स्त्रियांना तर शिक्षण मिळणे ही कठीण गोष्ट होती अशा काळात शांताबाईंनी जो शैक्षणिक प्रवास प्रारंभ केला व त्या ज्या ईप्सित स्थळी जाऊन पोहोचल्या त्याचे कौतुक वाटते.`[१] त्यांच्या

मनाची सुसंस्कृतता व तेजस्वी वृती असल्यामुळे सासर व माहेर सांभाळून, अनेक अडचणीवर मात करुन हे सर्व यश संपादन केले आहे. आपल्या गतायुष्यातील आठवणीना उजाळा देऊन त्या लेखननिर्दिष्ट करण्यासाठी त्यांना जी प्रेरणा मिळाली ती अरुण कांबळे सांगतात, " नानासाहेब झोडगे, शंकरराव खरात ही आमच्या गावाकडची मंडळी. आईनी त्यांचे लेखन जिव्हाळ्याने वाचले" [२] सामान्यपणे दलित आत्मकथन बोलीभाषेत सुरु होते व प्रमाण मराठी भाषेत यातील निवेदन पुढे बदलते. शांताबाईंनी सुध्दा आपले जीवनानुभव मांडत असताना याच पध्दतीचा अवलंब केला आहे. शांताबाईंचे हे जीवन समृध्द बनविण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींचा हातभार लागला त्या त्या व्यक्तींची व्यक्तीचित्रेही त्यांनी तितक्याच आदरयुक्त भावनेने चित्रित केली आहेत.

(१) सौ. शांताबाईंचे बालपण --

शांताबाईंचे लहानपणीचे नांव नाजुका. या महार जातीत एका अशिक्षित कुटूंबात जन्मास आल्या. घरचं दारिद्रय पाचवीला पुजलेलं. मोलमजूरी करुन व तराळकीची कामे करुन आई-वडिल संसार चालवत होते. यांची बऱ्याचवेळा उपासमार होई. अत्यंत हलाखीचे जीवन जगत असलेल्या या कुटूंबात व गावकुसाबाहेर असणाऱ्या महारवाडयात नाजुकाचे बालपण घडत होते.

त्यांच्याच जातीतील कांबळे मास्तरांच्या सांगण्यावरुन नाजुकास तिच्या वडिलांनी शाळेत घातले. नाजुका बरोबर त्यांचा भाऊ दत्तू व महारवाडयातील इतर मुले-मुली शाळेस जात होती. पण घरच्या दारिद्रयामुळे व अन्य कारणाने या मुलांनी शाळेस जाणे बंद केले. नाजुकास शिक्षणाची गोडी लागली. शाळेतील करमणुकीच्या व इतर कार्यक्रमात भाग घेऊ लागली. नाजुकाच्या या हुशारीकडे पाहून यशवंत बापू नाजुकाच्या वडिलांना म्हणाला, " सखाराम, पोरगी शाळंतन काढू नगं. खेळात बक्षिस मिळवतीया, लई हुशार हाय" [3]. हे शालेय जीवन कंठत असतांना नाजुकास जातीचे चटके बसत होते. महार मुलांना शाळेच्या बाहेर व सवर्ण मुलापासून दूर बसवले जात होते. त्यांचा स्पर्श करुन

घेतला जात नव्हता. ही जाती पातीची बंधने त्यावेळी सर्वच ठिकाणी पाळली जात होती. नाजूका लहानपणी आई बरोबर पंढरपूरच्या यात्रेस गेली असता त्यांना विठ्ठलाचे दर्शन जवळून घेता आले नाही. त्यावेळी नाजुकाच्या बाल मनात या जातीच्या बंधनामुळे प्रश्न निर्माण होई. हे असे का ? आपणाही माणूसच आहोत. नाजुका आपल्या आईस विचारते, "आये, मास्तर पन मानूस हाय.आपुनबी मानूस हाय. मग मास्तर कसा आपल्याला शिवून घेत नाय ?"[4] सहावीत असताना नाजुका भटाच्या शकूस तिच्या घरी बोलावण्यासाठी गेली तेव्हा नाजुका म्हणते, "मला बगून शकूची आय ओरडली, "ए म्हाराचे पोरे ! तिथच ऊबा राहा. दारात रांगुळ्या घातल्यात त्या तुडवील"[5] म्हणजेच दैनंदिन जीवनात बोलण्यातून-सुध्दा जातीचा उध्दार करून म्हार समाजाचा अपमान केला जात होता. या गोष्टी मात्र नाजुकाच्या मनास चटका बसवत होत्या.

घरची परिस्थिती नाजूक असल्याने नाजुकास कधी कधी फाटकी कपडे घालून शाळेत जावे लागे. एकदा थोरल्या भावाचे धोतर नेसून गेल्यावर मुला-मुलींनी हसून चिडविले. उपासमार ही कायमचीच. पावसाळ्यात तर या समाजाचे फारच हाल होत. अन्न असले तरी वाळलेल्या लाकडावाचून यांना उपाशीच झोपावे लागे. नाजुका म्हणते, "आय म्हनली, 'आता भाकरी करायला वाळलं जळानचं नाय.आपुन सारीजन उपासीच निजुया. सकाळी भाकरी करून घालून' त्या दिवशी आमी सारीजन उपासीच निजलु"[6] अशा अवस्थेत दिवस चालले होते.

नाजुका हुशार असल्याने तिला महिना तीन रुपयाची स्कॉलरशिप मिळू लागली. घरी सर्वांना आनंद झाला. या उत्तेजनामुळे चांगला अभ्यास करून नाजुका सहावी पास झाली. सातवीत जाताच मायेने दिलासा देणाऱ्या पाटील मास्तरांची बदली झाली आणि त्यांच्या ठिकाणी कदम मास्तर आले. पाचवी पासूनच ही शाळा शेतकी होती.कदम मास्तर म्हणाले, 'नाजा, ही शेतकी शाळा हाय, तुला सुतारकाम,लोहारकाम,दोरकाम करावं लागल. शिवाय फॅार्मीवर जाऊन पिकाचं निरीक्षण करावं लागल. तवा तुला ही काय जमनार नाय. तू दाकला

घेऊन पंढरपूरला मुलींच्या शाळेत शिकायला जा. तू वर्गात एकटीच मुलगी आहे." [७] या अशा बोलण्याने नाजुका समोर प्रश्न निर्माण झाला. आपली शाळा बंद होणार असे तिला वाटू लागले. कदम मास्तरांचे हे बोलणे रडतच घरी वडीलांना सांगताच वडिल म्हणाले, "नाजा, आपनाला अन्न खायाला नाय. मुलुकाची आपली गरिबी. पंढरपुरात ना कुनाची वळख ना पाळख. कसली जातीयाच पंढरपुरला शिकायला ? आता राहू दी तुजी शाळा". [८] यामुळे नाजुका शिक्षणापासून वंचित झाली. याचवेळी आई पोटविकाराने आजारी पडली आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. त्यामुळे नाजुकाच्या दु:खात भरच पडली. दुसऱ्या वर्षी पाटील मास्तर पुन्हा बदलून आले. त्यांना नाजुकाने शाळा बंद केल्याचे समजताच त्यानी तिला बोलावून घेतले व शाळेस येण्यास सांगितले.आई वारल्यामुळे घरचे जेवण करुन नाजुका शाळेत जात होती. अत्यंत कष्ट घेऊन ती सातवी पास झाली. वडीलांना खूप आनंद झाला. त्यांच्या डोळ्यात अश्रू आले व म्हणाले, "पोरी ! तुजी आय असती तर तिला लई आनंद झाला असता. ईतकी शाळा शिकलेली म्हाराची पोरगी सांगोले तालुक्यात कोनबी नाय-पोरी, तुझं नशिब लय चांगल हाय. तुज्या पाटीवर दोन भाऊ पण आल्याती. पोरगी नशिबाची हाय." [९] असा वडीलांनी दु:खमिश्रीत आनंद व्यक्त केला.

सातवीची परीक्षा दिल्यावर नाजुकाच्या घरी तराळकी आली. त्यावेळी नाजुका मानापमानाचा विचार न करता गावात तराळकीच्या भाकरी मागण्यास जात होती. आई वारल्यानंतर पोटाचे फार हाल होत होते. म्हणून नाजुका बहिणी बरोबर शेतात जाऊन ज्वारीच मातरं गोळा करुन आणतं. बैलानी खाऊन शेणातून टाकलेली ज्वारी धुवून घरी आणतं. पण चांगल्या ज्वारीची भाकरी पुरुषांना व शेणातील ज्वारीची भाकरी नाजुका व तिच्या बहिणीस खावी लागे. या अशा उपासमाराने कधी कधी ओले धान्य कुटून त्याच्या कण्या खाव्या लागल्या. यास कंटाळून नाजुकाचे वडील म्हणाले, "नाजा, तू, दत्तू, भगवान शिवऱ्याला चार दिस गंगूकडं जावा. खाऊन पिऊन या. मी तरी आता काय करु !." [१०] तेव्हा केवळ अन्नापायी पायपीट करत व रस्त्याने पाणी पीत ही

बाळपणापासून ते मोठेपणा पर्यन्त वारंवार मदत करणाऱ्या त्यांच्या बहिणी व ओघाने त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांच्याविषयीसुध्दा लेखिकेने सहानुभूती प्रकट केली आहे. त्यांचीही चित्रे सहृदयतेने येथे चित्रित केलेली पाहावयास मिळतात. आई वारल्यानंतर आईच्या ममतेने जवळ करणारी मोठी बहिण बुका तर उपाशी असताना खावयास घालणारी आणि भावंडांच्या अवस्थेकडे पाहून अश्रू ढाळणारी सिवन्यात दिलेली बहिण गंगू तितक्याच सहानुभूतीने रंगविली आहे. या बहिणींच्यावर जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा तेव्हा स्वत: लेखिका त्यांच्या मदतीस धावून गेल्या आहेत. कारण या धावण्या मागे त्यांच्या उपकाराची जाण लेखिकेच्या मनात होती हेच दिसून येते. बहिणी व त्यांचे नवरे यांनीही शांताबाई व त्यांच्या इतर भावंडाबद्दल वेळोवेळी चांगली भावना दाखवलेली असल्याने लेखिका त्यांच्या प्रत्येक दु:खात स्वत: दु:खी झालेल्या पाहावयास मिळतात. जेव्हा मोठी बहिण वारली तेव्हा शांताबाई अगदी सद्गदीत होऊन म्हणतात, " प्रत्यक्ष आई गेल्याचं इतकं दु:ख झालं नव्हतं कारण त्यावेळी मला इतकं समजतच नव्हतं. माझ्या थोरल्या बहिणीनं मला तितकं ममतेनं सांभाळलं होतं, आईचं प्रेम तिनं दिलं होतं, म्हणून ती गेली तेव्हा मला पुन्हा एकदा आईच गेल्याचं दु:ख झालं" [१४] या ठिकाणी लेखिकेच्या अंगी असणारी मानवतावादी वृत्ती व उपकाराची जाण हे गुण असल्याचे दिसून येतात. म्हणूनच " शांताबाईंच्या या आत्मकथनात स्नेह्यांच्या संबंधितांच्या कारुण्यपूर्ण मृत्यूची किनार लाभलेली आहे. " [१५] हे मत पटणारे आहे. वारंवार मदत करणारा भाऊही येथे पाहावयास मिळतो. या सर्वांची परिस्थिती गरिबीचीच होती पण त्यातूनसुध्दा शांताबाई व त्यांच्या भावंडांना मदतीचा हात यांनी दिलेला पाहावयास मिळतो. आपुलकी, जिव्हाळा, माया-ममता हे स्त्री सुलभ गुण दिसून येतात.

या बरोबरच लहानपणी शिक्षणात मदत करणारे पाटील मास्तर व त्यांची पत्नी, विमेन कॉलेज मधील लेडी सुपरिंटेंडेन्ट सुधा अत्रे, बडवे साहेब, सहकारी भालचंद्र दि. माडगुळकर, देशमुखसाहेब, इत्यादिंची व्यक्तीचित्रे व यांच्या असणाऱ्या लेखिका बद्दलच्या भावना त्यांनी भावपूर्णरितीने चित्रित केल्या आहेत.

सर्व भावंडे बहिणीच्या गावी जात. या सर्वांची भूकेने झालेली अवस्था पाहून बहिण गंगू रडत असत. तेव्हा नाजूका म्हणते, "बालू आली, ती म्हनली, " काय ग बाई ! आय वारली, पोरंगं कशी बंगाळ दिसत्याती. "[11] अशा या सर्व यातना सहन करत नाजूका ल्हानाची मोठी झाली.

(२) सौ. शांताबाईच्या जीवन घडणीत इतर व्यक्तींचे सहाय्य ---

सौ.शांताबाई स्वत:च्या जीवनाची चित्तकथा सांगत असताना त्यांच्या जीवनात जे अनेक प्रसंग घडले, अनेक यातना सहन कराव्या लागल्या हे सांगून जातात. या सर्व यातना सहन करत त्यांच्या जीवनाची जी जडण घडण झाली, त्यास ज्यांचा ज्यांचा हातभार लागला त्या सर्वांची व्यक्तिचित्रे त्यांनी सहानुभूतीने चित्रित केली आहेत.

मुख्य म्हणजे यांच्या जडण-घडणीस त्यांच्या आई-वडीलांचा लागलेला हातभार मोलाचा आहे. कारण या बाल मनास शिक्षणाची वाट दाखवणारे ते आहेत. आईचे ममतेने भरलेले हृदय जसे त्यांनी येथे उघडे केले आहे त्याचप्रमाणे प्रसंगी कठोर बनलेले मनही येथे चित्रित केले आहे. शांताबाई आठ दिवस शाळेस गेल्या नाहीत त्यावेळी आईने बैलाच्या कासऱ्याने मारत शाळेत नेले व मास्तरास म्हणाल्या, "मास्तर, हिला आता सोडू नगा. शाळंत कोंडून ठिवा. हिला साखळीला बसून खाकंा. उनातानात शेंगाला जातीया. "[12] पण या कठोरपणात माया गुंतलेली होती. अनेक कष्ट उपसून दुसऱ्याच्या शेतात मोलमजूरी करून, गवत आणून विकून कसा तरी संसार रेटणारी आई येथे पाहावयास मिळते. वडीलांनी तर शांताबाईंना ल्हानपणापासून ते लग्न झाल्यावर व पुढे नोकरीला लागल्यावर ज्या ज्या आपत्या आल्या त्या त्या वेळी मोलाची साथ दिली आहे. मुलीच्या सुखात सुख मानणारे व दु:खाच्या वेळी कष्टी होणारे लेखिकेचे वडील आप्पा येथे पाहावयास मिळतात. म्हणून जेव्हा वडील वारले तेव्हा लेखिका दु:खभऱ्या अंत:करणाने म्हणतात, "आप्पा होते त्यामुळे आईचे दु:ख इतके जाणवले नाही. आता मायेचे जवळचे कोणी नाही असे वाटते. "[13]

(३) नाजुकाचे संसारात पदार्पण --

आई वडीलांच्या इच्छेप्रमाणे नाजुकाचा विवाह करगणीचे कांबळे मास्तर यांच्याशी झाला. नवरा शिक्षक मिळाला म्हणून सर्वांना आनंद झाला. नाजुका सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे हे पती कडील नाव धारण करुन संसार करु लागल्या.

पतीच्या घरचीही परिस्थिती गरिबीची होती. शांताबाईची सासू, दिर, नणंद हे सर्वजण सांगलीत. मद्याचे कोळसे आणून विकत व पोटाची गुजराण करत. सासऱ्याच्या डोक्यावर परिणाम झाल्याने ते सारखे बडबडत. पती मास्तर असल्यामुळे शांताबाईचा संसार सुखात चालला होता. घरच्या व इतर माणसांना वाटू लागले की मुलगी सुखात पडली.

आटपाडीहून मास्तरांची बदली दिघंचीला झाल्याने तेथे सर्वजण राहण्यासाठी आले. देवदर्शन घेण्यासाठी ते पंढरपूरला गेल्यावर तेथे मास्तरांचा मामा व मामी त्यांना भेटले त्यांनी आपल्या विधवा मुलीस धोंडूबाईस मास्तरांना देण्याची इच्छा व्यक्त केली. यामुळे शांताबाई पुन्हा दुःखाच्या सागरात लोटल्या गेल्या. कांबळे मास्तरानी केवळ पैशाच्या लोभाने हा दुसरा विवाह करण्याचे कबूल केले. शांताबाईनी असे न करण्याबाबत विरोध दर्शविताच मास्तर म्हणाले, "मला आता काय सूचत नाय, गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाय तर मोडून खाल्ली. तू काय भिऊ नगं, तुला मी सोडत नाय." [१६] शांताबाईना हे सहन न झाल्याने त्या आपल्या माहेरी वडीलाकडे निघून आल्या. त्यावेळी त्या सात महिन्याच्या गरोदर होत्या. त्यांनी वडीलांना सर्व हकिकत सांगताच, शांताबाईवर आलेली ही अवस्था पाहून वडील म्हणाले, "मास्तर आदीच ऊंगा हुता. आमी चवकशी केली नाय. ती ठिवल्याली बाय वराडा संगं आली हुती. आमी तिला मागती पाटवलं. आता करनार काय ? लग्नालाच आलुया, गुमान लग्न लावलं. आन् आसं तुझं वाटुळ लागलं." [१७] वडीलांचे दुःख व घडलेली सर्व परिस्थिती पाहून

शांताबाई मनात म्हणतात, "बाप म्हातारा - आय वारली - आता माझां कसं होणार ? "[१८] असे दु:खाने पुन्हा ठाण यांच्या मायुष्यात मांडले. यावरून एकंदरीत त्याकाळी स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोनही यातून प्रकट होतो. महार जातीत जन्मल्यामुळे निर्माण झालेले सामाजिक दु:ख व पतीच्या लोभी वृतीमुळे निर्माण झालेले दु:ख पाहून पु.ल. देशपांडे म्हणतात, " त्या दृष्टीने 'चितरकथा' ही एका दलित समाजातील स्त्री ची आत्मकथा आहे आणि दलित आणि स्त्री अशा जात्यात घालून वरून रगडल्या जाणा-या स्त्री ची प्रातिनिधिक कथाही आहे. "[१९] हे त्यांचे मत पटण्यासारखे आहे.

(४) दु:खावर मात करून मार्ग काढणा-या शांताबाई ---

संसारात निर्माण झालेल्या या दु:खाने हतबल न होता निर्धाराने त्यास तोंड देण्याचे ठरविले. पती बोलावण्यासाठी आल्यावर त्यांनी निर्धाराने उत्तर दिले की "बायकू केलीया ! आता मी काय येत नाय. तिला घेऊन जावा. आनु खुशाल राज्य करा. आता माझी आशा सोडाच."[२०] लग्नाआधीच पाटील मास्तरांच्या सांगण्यावरून शिक्षिकेच्या नोकरीसाठी अर्ज केला होता. त्या अर्जावरून त्यांना सोलापूरला मुलाखतीसाठी बोलाविले. त्यांना स्वत:चे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी हा आधार वाटला, त्या सिध्द झाल्या आणि मुलाखतीस गेल्या. प्रवास खर्चास पैसे नव्हते ,मुलाखत देऊन परत येताना शांताबाई व वडीलांना पायीच प्रवास करावा लागला.त्यात सात महिन्याच्या गरोदर असल्याने पोटात दुखत होते. चालून पाय सुजले. इतक्या यातना सहन केल्याच त्यांना योग्य फळ मिळाले. अकलूज शाळेत बनूताई नारेकर यांच्या जागी बदली शिक्षिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. अकलूजला जाण्यासाठी मोटार सर्व्हिस नसल्याने लेखिकेने घोड्यावरून व वडील चालत असा प्रवास करून शेवटी त्या शाळेत हजर झाल्या. शारीरिक व मानसिक त्रासामुळे दोन महिन्यातच शांताबाई थंडी-तापाने आजारी पडल्या. बाळंतपणाची रजा काढून महूदला परत आल्या. पहिला मुलगा झाला आणि लगेच वारला. पूर्वीच्या दु:खात पुन्हा भर पडली. नशिबाची परीक्षा

चालू होती. पुन्हा पोटाचे हाल होऊ लागले. म्हणून सव्वा महिन्याची बाळंतीण असताना बहिणी बरोबर दुसऱ्याच्या शेतात मजूरीस जाऊ लागल्या.

बनूताई नाटेकर आपल्या जागी हजर झाल्यावर शांताबाई पुन्हा नोकरीसाठी सोलापूरला साहेबांना भेटण्यासाठी गेल्या. आठ दिवसात कुर्डूवाडी येथील मुलींच्या शाळेत हजर राहण्यासाठी त्यांना वरून हुकूम आला. सर्वांना आनंद झाला. १६-१-१९४२ रोजी कुर्डूवाडी येथे हजर झाल्या. लेखिका दुसरे लग्न करील या चिंतेने पती कांबळे मास्तर आधून-मधून यांच्याकडे येऊन जात असत व शांताबाईंना येण्याबाबत सांगत असत. पण करारी वृत्तीच्या शांताबाई गेल्या नाहीत. कुर्डूवाडी येथे असताना त्यांचे दिवस सुखासमाधानात जात होते. येथे असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दर्शनाचा योग त्यांच्या आयुष्यात आला. बाबांना पाहण्यासाठी व त्यांचे भाषण ऐकण्यासाठी शांताबाई सोलापूरला गेल्या. सर्व स्त्रियांच्या बरोबर यांनीही बाबांना ओवाळले. त्या सांगतात, " आरती ओवाळताना मी म्हणाले, " बाबा तुम्हाला दिर्घायुष्य लाभो " [२१] त्यावर बाबा म्हणाले " बाळ, कशाला दिर्घायुष्य मागतेस ? मी अस्पृश्यासाठी खूप कार्य केले आहे. "[२२] हे बाबांचे उद्‌गारही सहानुभूतीने त्यांनी येथे व्यक्त केले आहेत. डॉ. आंबेडकरांची भेट होऊन त्यांना ओवाळणे व त्यांच्याशी बोलणे हा त्यांच्या आत्मकथनातील एक विशेष प्रसंग समजावा लागेल. बाबांचे भाषण ऐकण्यासाठी व त्यांना पाहण्यासाठी खेड्यातील हजारोंनी लोक आले होते हे सांगून पुढे लेखिका म्हणतात, बाबा स्टेजवर आल्यावर स्त्रिया त्यांच्याकडे हात करून म्हणत होत्या, " कशाला दगडाच्या देवाला पूजता ? तो बघा आपला चालता बोलता देव "[२३] त्याच बरोबर बाबा भाषणात सांगत होते " मी काय गावोगाव पोतराजा सारखे फिरत नाही .... तुम्ही मुलांना शिकवा. मृतमांस खाऊ नका, मेलेली जनावरे ओढू नका... " [२४] असे बाबांच्या बद्दल त्यांनी सहानुभूतीने येथे लिहीले आहे. बाबांच्या दर्शनाचा लाभ घेऊन लेखिका परत आल्या. पण जाता जाता बाबांच्या मनातील अस्पृश्य वर्गाबद्दल असणारी खंतही त्यांनी येथे नोंदविली आहे. ही हकिकत पूर्वी त्यांच्या पतीने त्यांना सांगितली होती. (... ता. बार्शी)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

येथे होती. या सभेसाठी बाबांचे अनुयायी तिरमारे मास्तर सांगलीहून आले होते. सभा संपताच त्याना दुसऱ्या दिवशी येथेच भेटण्यासाठी सांगितले. तिरमारे भेटण्यासाठी गेल्यावर बाबानी स्वत:च्या खिशातून एक अर्ज काढला व तिरमारे यांच्याकडे दिला. तो अर्ज एका झाडूकामगार अस्पृश्य स्त्रीने सांगलीच्या राणी - सरकारकडे केला होता. त्यात लिहीले होते, "मला खालती कडची बामन आळी नको. वरतीकडची द्या. मला महिना चार-पाचच रुपये पगार द्या. पण वरतीकडची बामन आळी द्या"[२५] याचे कारण त्या अर्जात नमूद केले होते, " वरतीकडच्या बामन - आळीला शिळेपाके, उष्टेपाष्टे मिळते. फाटकी तुटकी कापडं मुलांना घालायला मिळतात. शिळंपाकं व उष्टंपाष्टं मुलं व मी दिवसभर खातो. हे खालतीकडच्या आळीला मिळत नाय."[२६] तेव्हा बाबानी अस्पृश्यवर्गाबद्दलची आपली खंत व्यक्त केली. ते म्हणाले, "आम्ही रात्रं दिवस समाज सुधारण्यासाठी झटतो, प्रयत्न करतो, सभा घेतो, त्यांच्याकरिता भांडतो, त्याचे काय होते हे ह्या अर्जावरून दिसते."[२७] आणि शेवटी जाता जाता म्हणतात, "गटारे सुधारतील, पण आपल्या इथला समाज सुधारणा नाही."[२८] यातून बाबांचे समाजासाठी चाललेले कार्य व तत्कालिन अस्पृश्य वर्गाची मनोवृतीच येथे लेखिकेस नमूद करावयाची आहे.

लेखिकेचे पती कांबळे मास्तर व त्यांची दुसरी पत्नी धोंडूबाई यांचे सतत भांडण होत. मास्तरांचे यामुळे संसारात लक्ष लागेना म्हणून या पत्नीस माहेरी पाठवून स्वत: मुंबईला गॅरेजमध्ये पैसे कमवण्यासाठी गेले. एक वर्षाने ते पुन्हा नोकरीवर हजर झाले. त्याची बदली खरसुंडीला झाली. दुसऱ्या पत्नीस परत आणले. पण त्यांचे भांडण दिवसे दिवस वाढत गेल्याने कांबळे मास्तरानी युक्ती केली की, धोंडूबाईचा भाऊ आजारी असल्याचे खोटे पत्र लिहीले आणि या कारणाने तिला माहेरी घालवले. त्यानंतर लगेच शांताबाईना त्यांनी पत्र पाठवले की, "माझ्या या बायकोशी संसार व्हायचा काय दिसत नाही. तिला मी कायमची माहेरी पाठवून दिली. तिला आता कधीच आणणार नाही. आता आपण आनंदाने संसार करुया."[२९] पण ही दुसरी बायको आज ना उद्या येणारच असा विचार करून शांताबाई गेल्या नाहीत. मास्तर आठ दिवसानी कुर्डूवाडीला

आले आणि त्यांनी बळजबरीने शांताबाईंना पुढे घालून घेऊन गेले. सात-आठ महिन्यानी दुसरी पत्नी आपल्या वडीलांना घेऊन आली. तेव्हा शांताबाईंनी परत कुर्डुवाडीला नोकरीच्या ठिकाणी जाण्याचे ठरवताच मास्तरानी ऐकले नाही. दुसऱ्या पत्नीस शेवटी वेगळे ठेवले पण ती सतत भांडण करी. तेव्हा दुसऱ्या पत्नीच्या वडीलांना मास्तरानी सांगितले मी साताऱ्याला ट्रेनिंगसाठी जाणार तुमच्या मुलीला माहेरी घेऊन जावा. शांताबाईंना कांबळे मास्तरानी स्वतःच्या आईजवळ ठेवले व ते साताऱ्यास निघून गेले. शांताबाईंचे मन येथे लागेना. शेवटी त्या माहेरास गेल्या. सून माहेरी गेल्याचे सासूने लगेच कांबळे मास्तराना पत्राने कळवताच मास्तर साताऱ्याहून आले आणि त्यानी कर्पनळच्या पोलिस स्टेशनमध्ये खोटी तक्रार नोंदविली की, " मेहुणा शंकर महार आहे, त्याची बहिण माझी बायको आहे. ती घरातील सोन्याचे दागिने व पैसे घेऊन पळून आली आहे." [30] तेव्हा शांताबाईंचा भाऊ हवालदारास भेटून म्हणाला, " हवालदार, माझी बहिण कुर्डुवाडीला मास्तरीन हाय. तिला का पैसा कमी हाय का ? मास्तर जवळ पैसा आन् सोने कुठलं ?" [31] कुर्डुवाडी शाळेतील रजा संपल्याने शांताबाई स्वतःस हजर करुन घेण्यास सांगण्यासाठी सोलापूरला साहेबाना भेटण्यासाठी गेल्या. तेव्हा साहेब म्हणाले, " तुमच्या मालकांनी पैसे व सोने घेऊन माझी पत्नी आली आहे तिला तुम्ही हजर करुन घेऊ नये म्हणून अर्ज दिला आहे. तेव्हा दोघांचे भांडण मिटल्याशिवाय तुम्हाला हजर करुन घेता येत नाही." [32] असे पतीने शांताबाईंच्या समोर पुन्हा संकट उभे केले. शांताबाई पुन्हा अर्ज करतच राहिल्या. पूर्वीचे साहेब बदलून तेथे नवीन साहेब आल्यावर शांताबाई त्यांना भेटल्या तेव्हा साहेबांनी लवकरच आपणास कळवितो असे सांगितले.

आपल्या पत्नीस आपल्याकडे पाठवून देण्यासाठी तिचा भाऊ आडवा येतो असा गैरसमज करुन घेऊन कांबळे मास्तरानी शांताबाईंच्या भावास मारण्याचा कट मित्रांच्या मदतीने रचला. पण यातून वाईटच निष्पण होणार व आपली पत्नी आपल्यास कायमची मुकणार असा विचार करुन कांबळे मास्तरांनी असे करणे बंद केले. कांबळे मास्तरानी शहाणपणाने हा विचार केला नसता तर शांताबाईंच्या दुःखात आणखीन भर पडली असती. पतीने सर्व बाजूनी

कोंडी करण्याचा प्रयत्न केला पण शांताबाई डगमगल्या नाहीत. त्यानी स्वतःची जिद्द सोडली नाही.

नवीन साहेबांनी शांताबाईंची बदली आडवळणी असणाऱ्या कडलास या गावी केली. तेथे मोटारीची सोय नव्हती. शेवटी बैलगाडीने प्रवास करून शांताबाई तेथे हजर झाल्या. हा काळ १९४८ चा होता. वाटेतच एका स्त्रीने शांताबाईंना आपण कोण व आपली जात काय ? हे विचारताच शांताबाईंनी आपली शिक्षिका म्हणून येथे बदली झाल्याचे व जातीने महार असल्याचे सांगताच ती बाई म्हणाली, " आमचं कडलास गाव गायकवाडाचं हाय. बाय शाळावर टिकू देत नायत. दोन बायाना मारूनच घालवलं. "[33] असं ऐकताच शांताबाई विचारात पडल्या पण मनाचे धैर्य मात्र त्यांनी सोडले नाही. कडलास गावच्या पंचानी शांताबाईंना बोलावून घेतलं. नारायण गायकवाड म्हणाले," हे बघा बाई आमच्या गावात बाई टिकत नाही. " लगेच सदाशिव गायकवाड म्हणाले, " आमच्या गावात दोन पार्ट्या आहेत. त्या बाई दोन्ही पार्टीचे ऐकतात. आणि शेवटी मार खाऊन जातात. "[34] त्यावर शांताबाईंनी खंबीरपणे उत्तर केले की, " त्या बाई एकपट राहात असतील तर मी चौपट वागेन. "[35] असे शांताबाईंचे बोलणे ऐकताच पंचमंडळी एकमेकांच्या तोंडाकडे पाहात राहिली. लेखिकेच्या बोलण्याचा राग करून गावातील लोक म्हणू लागेल, " बघ्या, आता या बाई गावात कशा राहतात ? "[36] यावरून तत्कालीन स्त्री कडे व त्यातल्या त्यात दलित स्त्री कडे पाहण्याचा सवर्णांचा व पुरूषा वर्गाचा दृष्टिकोन कसा होता हे येथे लेखिकेस सूचित करावयाचे आहे. शांताबाई शाळेत हजर झाल्या. आपल्या जातीच्या बाई आल्या म्हणून अस्पृश्य वर्गातील लोकांना आनंद झाला. त्यांनी आपल्या मुलीना शाळेत पाठवले. त्यामुळे शाळेचा पट वाढला. शांताबाईंची शिकविण्याची तळमळ व कष्ट पाहून शेवटी कडलास गावच्या लोकांच्या मनात परिवर्तन झाले व ते म्हणू लागले, " आमच्या गावातील शाळेसाठी याच बाई पाहिजेत. म्हणून पु.ल. देशपांडे म्हणतात, " प्राथमिक शिक्षकांना क्वचित लाभणारं मानाचं स्थान शंभर टक्के, स्वतःच्या कर्तबगारीवर मिळवलं. दलित समाजातल्या शिक्षक विशेषतः शिक्षिकांच्या गुणवत्तेविषयी प्रवाद उठविण्यात

धन्यता मानणाऱ्या तथाकथित सुशिक्षित समाजाला देखिल शांताबाईंसारख्या शिक्षिकेने आपल्या गावात यावे आणि आपल्या मुला-मुलींचे शिक्षण करावे असे वाटण्याइतकी कर्तबगारी त्यांनी दाखविली.[*37] कधी जातीमुळे तर कधी पतीमुळे अनेक संकटे शांताबाईंच्या आयुष्यात आली. स्वतःच्या मनाचा कणखरपणा दाखवून या प्रत्येक संकटाच्या त्या सामोरे गेल्या. या संकटावर स्वतःच्या जिद्दीने विजय मिळविला पण कधी डगमगल्या नाहीत. तेव्हा " अनेक अडचणीवर मात करीत लेखिकेने हे यश गाठले. म्हणूनच त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी दुःख - कष्टांची रडगाणी गायली नाहीत. दुःखाना कुरवाळले नाही, दलित स्त्री आणि गरीब म्हणून कोठेही सहानुभूतीही मिळविण्याचा प्रयत्न केलेला नाही."[38] हे कुसरे-कुलकर्णी यांचे मत योग्य आहे. लग्न होऊन सुद्धा या सर्व संकटांना त्यांनी तोंड दिले, त्यातील दुःखे भोगली पण कुणाकडे कधी सहानुभूतीसाठी हात पसरला नाही. स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांनी लोकांची मने जिंकली.

(५) उत्कर्षाचा काल ---

कांबळे मास्तरांची दुसरी पत्नी माहेरीच वारली. मास्तर शांताबाईंच्या--कडे सतत येऊ लागले. त्यानंतर यांचा संसार सुखाचा सुरु झाला. १९५० साली शांताबाईंची ' पुणे विमेन ट्रेनिंग कॉलेज ' येथे शिक्षिकेच्या ट्रेनिंगसाठी निवड झाली. दरम्यानच्या काळात या उभयतांनी करगणी येथे स्वतःचे घर बांधले. इतका वनवास भोगल्यावर लेखिकेच्या जीवनात सुखाचे दिवस आले. ट्रेनिंग संपवून येताच शांताबाईंच्या कर्तृत्वामुळे कडलास गावच्या रामचंद्र पाटलांनी पुन्हा शांताबाईंचीच मागणी आपल्या गावच्या शाळेसाठी केली. पुढे १९५२ साली शांताबाईंनी जिल्हा ट्रान्स्फरसाठी साहेबांच्याकडे अर्ज केला. ८-१-१९५३ रोजी त्याची बदली आटपाडीच्या शाळेत झाली. येथे हजर होण्यासाठी जाताच तेथील हेडमिस्ट्रेस यांनी हजर करुन घेण्यासाठी प्रथम-विरोध केला पण शेवटी हजर करुन घेतले. नंतर बाळंतपणाची रजा काढून शांताबाई करगणीला आल्या. मुलगा झाला. सर्वांना आनंद झाला. दिड महिन्याने लगेच आटपाडी शाळेत

हजर झाल्या. मदतीसाठी घरी दुसरे कोणी नसल्याने मुलास शाळेत घेऊन जावे लागत. एकंदरीत घरची सर्व जबाबदारी एकट्या शांताबाईंच्यावर पडलेली होती.

आटपाडी भागाचा विकास व्हावा म्हणून देशमुख साहेब भागातील शाळांना सायकलवरून प्रवास करत सतत भेट देत. शाळेचा विकास करण्यासाठी जादा कष्ट करणे, त्यात घरचे काम, येणारे-जाणारे पाहुणे यामुळे शांताबाईंची सतत धावपळ होई. सकाळी कसे तरी जेवण आटोपून जावे लागे. दुपारी मुलास दूध पाजण्यात वेळ जाई त्यामुळे फक्त रात्रीचेच तेव्हढे जेवण व्यवस्थित मिळे. या धावपळीच्या व धकाधकीच्या परिस्थितीमुळे शांताबाई आजारी पडल्या.

६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निधन झाल्याचे समजताच सर्व अस्पृश्य वर्गाबरोबरच या उभयतानांही अत्यंत दु:ख झाल्याचे लेखिका सांगतात. कांबळे मास्तर बाबांच्या पार्थिव देहाचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी मुंबईस निघून गेले.

१९५९ साली या उभयतांची बदली दिघंची शाळा नं. १ मध्ये झाली. शांताबाई मुख्याध्यापिका म्हणून तेथे हजर झाल्या. चौथीपर्यन्तच वर्ग असणारी ही शाळा शांताबाईंनी कष्ट घेऊन सातवीपर्यन्त वाढवली आणि या शाळेचा विकास केला. दिघंचीमध्येच कांबळे मास्तरांची शाळा नं. २ मध्ये मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. शांताबाईंच्या वरील कामाची जबाबदारी वाढली. या कामाच्या धकाधकीमुळे एके दिवशी त्यांच्या छातीत जोराची कळ आली. डॉक्टरांनी त्यांना सांगितले, " बाई, तुमचे हृदय कमजोर झाले आहे. तेव्हा तुम्ही नोकरीचा राजीनामा द्या " [39] मुलांच्या शिक्षणाचा खर्च, नातेवाईकांना करावी लागणारी मदत याचा विचार करून शांताबाईंनी राजीनामा देण्यासाठी नकार दिला. दोन्ही शाळामध्ये निकाल सुधारण्यासाठी चढाओढ सुरू झाली. इतर शिक्षकांच्या मदतीने या दोन्ही शाळांचा सातवीचा निकाल १०० टक्के लागला. दोन्ही शाळां मधील मुला-मुलींची पट संख्या वाढवून या कांबळे जोडप्याने एकप्रकारचा लौकीक मिळविला.

सेवा ज्येष्ठतेनुसार सौ. शांताबाई व त्यांचे सहकारी भा. दि. कुलकर्णी

( माडगुळकर ) यांना १९८० मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून माडग्याळ बिट्या ( ता.जत ) हुकूम आला. त्यावेळी शांताबाईंच्या निवृत्तीस साडेपाच महिने राहिले होते. हे पद इतक्या काळासाठी स्वीकारण्याची इच्छा शांताबाईंची नव्हती. शांताबाई कौतुकाने येथे सांगून जातात, की त्यांच्या मुलांनी त्याना पत्रातून लिहीले की, " आई, तुला शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून ऑर्डर झालेली आहे. शिक्षक म्हणून निवृत होण्यापेक्षा साहेब म्हणून तू निवृत्त होशील. तेव्हा तू काही रहित करु नकोस. " ४० तेव्हा यामुळेच आपण पद स्वीकारल्याचे येथे लेखिकेने कबूल केले आहे. अधिकारी बनल्याने शांताबाईंचा अनेक ठिकाणी सत्कार झाला. अधिकारी म्हणून अनेक शाळांना भेटी देऊन तेथील शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले. भटक्या पारध्यांच्या व लमाणी मुलांच्या शाळांना भेट देऊन त्या लोकांच्या जीवनाचे त्यानी केलेले निरीक्षणही त्यांनी नोंदविले आहे. यातून या गरीब जमातीकडे पाहण्याची त्यांची कणवाळू वृत्ती आपल्या प्रत्ययास येते.

दिनांक २८-२-१९८१ रोजी शांताबाई शिक्षणाच्या या जबाबदारीतून निवृत्त झाल्या. माडग्याळ बिट्च्या लोकानी प्रथम त्यांचा निरोप समारंभ घडवून आणला. आपल्या भाषणात अनेक शिक्षकांनी शांताबाईंच्या कार्याचा गौरव केला. शांताबाईंनी सुध्दा आपल्या भाषणातून शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले. लगेच बौध्दवाडयात कार्यक्रम झाला. हरिजन समाजातील उबळे गुरुजी आपल्या भाषणात म्हणाले, " आमच्या समाजातील हे साहेब शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून आले. आम्हाला आनंद झाला. आणि हे जोडपे आमच्या समाजात रमून गेले. "४१ नंतर अनेक लोकांनी भाषणे करुन शांताबाईंनी आपल्या समाजातील मुलांसाठी केलेले कार्य व स्वत:च्या सुध्दा मुलांना शिक्षण देऊन त्याचे जीवन कसे घडविले असे सांगून एकंदरीत त्यांच्या सर्व कार्याचा गौरव केला. बौध्द बांधवांनी व भगिनींनी त्यांना प्रेमाचा निरोप दिला. अशा या स्वत:च्या जीवनाचा विकास करत असतानाच आपल्या समाजातील मुले शिकावी व शहाणी व्हावी यासाठी झटणाऱ्या या शांताबाई येथे पाहावयास मिळतात.

(६) <u>सामाजिक कार्य ---</u>

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जनजागरणाच्या काळामध्ये खेडयापाडयातील लोकांच्यामध्ये जागृति निर्माण झाली. प्रत्येकास आपल्या पशुतुल्य जीवनाची जाणीव झाली. शांताबाईंनासुध्दा बाबांचे दर्शन लाभले हा त्यांच्या जीवनातील मौलिक क्षण म्हणावा लागेल. जणू त्यांच्या कार्यास पाठिंबा व्यक्त करण्यासाठीच व आपल्या वर्गातील लोकांचे जीवन सुखकर होण्यासाठी, त्याना मानाने जगता यावे म्हणून करगणीच्या लोकाबरोबर धर्मान्तर करुन शांताबाईंनी पुढील पिढीत जणू चेतनाच निर्माण केली. धर्मान्तराच्यावेळी सवर्णांकडून होणाऱ्या विरोधास यानी दाद दिली नाही.

१९५९ मध्ये शांताबाई व त्यांचे पती दिघंची येथे असताना जिल्ह्यात ग्रामगौरवाचे सत्र जोरात सुरु होते. या उभयतांनी आपल्या अस्पृश्यवर्गास अक्षर ओळख करुन देऊन त्यांचे जीवन सुखकर बनविण्यासाठी दिघंचीतील बौध्द वाडयात साक्षरतेचे वर्ग सुरु केले. शांताबाईंनी स्त्रियांचे व कांबळे मास्तरांनी पुरुषांचे वर्ग सुरु केले. त्यांची चांगलीच तयारी करुन घेतली. यांच्या प्रौढ वर्गाचे निरीक्षण करण्यासाठी आलेले हिकम साहेब या उभयतांच्या कामावर खुष झाले. हे दोघे आटपाडी येथे असताना आटपाडीस सातवीचे केन्द्र मिळावे. परीक्षेच्यावेळी आसपासच्या खेडयातून येणाऱ्या हरिजनांच्या मुलांची जेवणाची व्यवस्था कांबळे जोडप्याने स्वतःच्या घरात केली. त्यांनी केलेली जेवणाची उत्तम व्यवस्था पाहून देशमुख सभापती व भागाधिकारी माडगुळकर खूष झाले. वरिष्ठांनी यांच्या कामाबद्दल व्यक्त केलेली सहानुभूती हीच त्यांच्या कार्याची पावती होती.

आपल्या समाजातील मुले व मुली शिकून शहाणी व्हावीत यासाठी स्वतः शांताबाई हरिजनवाडयात जाऊन मुलांना शाळेत पाठवण्यासाठी त्यांच्या पालकांना सांगत. ही त्यांची समाजाबद्दल चाललेली धडपड सामाजिक कार्याची आठवण करुन देते. नोकरी करत असताना सर्व जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षणाचे उत्तम कार्य शांताबाईंनी केलेले पाहावयास मिळते. म्हणूनच " डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांची तत्वे आणि शिकवणूक अंगी बाणवून त्याबरहुकूम आपल्या जीवन प्रवासाची वाटचाल करणारी ही लेखिका आहे.[४२] हे उद्गार शांताबाईंच्या विषयी तंतोतंत लागू पडते. सेवेतून निवृत्त होताच इतर लोकांनी केलेल्या निरोप समारंभा बरोबरच बौध्दवाडयातही निरोप समारंभ करून शांताबाईंच्या कार्याचा, स्वभावाचा व गुणांचा गौरव होणे, आणि आपल्या हरिजन बांधवांच्या हृदयात स्थान मिळविणे हीच त्यांच्या सामाजिक कार्याची पावती होय. अशा रितीने शिक्षणाच्या मार्गाने जमेल तसे समाज कार्य करून बाबासाहेबांच्या समाजकार्यास पाठिंबा देणाऱ्या शांताबाई येथे पाहावयास मिळतात.

समारोप ---

शांताबाईंचा या आत्मकथनातून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील सामाजिक दर्शन होते. या काळात अस्पृश्य वर्गास समाजात असणारे स्थान, त्यांची दु:खे, यातना, अंधश्रध्दा, धार्मिक भावना, शैक्षणिक दृष्टिकोन या सर्वांवर शांताबाईंनी प्रकाश टाकला आहे. म्हणूनच "या आत्मकथा वाचकांना स्वत:बरोबर प्रत्यक्ष जीवनाच्या प्रांगणात घेऊन जातात, त्या जीवनाचे दर्शन घडवितात.[४३] हे कव्हेकरांचे मत पटणारे आहे. शांताबाईंच्या या आत्मकथनाचा सारासार विचार करता त्यांच्या मनात फार खोल जाऊन भिडलेल्या जखमांची ही कहाणी आहे. पण ही दु:ख कहाणी मांडत असताना त्याचा गाजावाजा कुठेही केल्याचे आढळत नाही. अगदी संयम रितीने हे सर्व त्यांनी कथन केलेले आहे. लहान लहान वाक्यांचा उपयोग करून बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांचा मार्मिक उपयोग केलेला असल्याने निवेदनास एक प्रवाहीपणाचे रूप प्राप्त झाले आहे. कुठेही त्यांनी कृत्रिम नाट्य किंवा शब्दांना अलंकार चढवण्याचा प्रयत्न केलेला नाही. दररोजच्या बोलीतूनच बरेचसे निवेदन झालेले आहे.

असे असले तरी इतर दलित आत्मकथनातून दिसून येणाऱ्या दारिद्र्याच्या मानाने यातील दारिद्र्याचे प्रसंग खूपच कमी आढळतात. म्हणजे दु:खाचे व

दारिद्र्याचे चटके शांताबाईंना बसले नाहीत असा त्याचा अर्थ होत नाही.परंतु निवेदनात त्याच्यावर माफक भर दिला गेला आहे. म्हणूनच वाचकाचे मन लेखनातील दु:खाने पिळवटून निघावे किंवा त्याच्या मनास चटका बसावा असे निखळ,कलात्म व भावनात्मरूप या आत्मकथनास लाभलेले नाही.

वरील त्रुटी पाहावयास मिळत असली तरी शांताबाईंच्या या आत्मकथनाच्या गुणांची रास वर सांगितल्याप्रमाणे फार मोठी आहे. त्याच बरोबर हजारो वर्षांपासून अबोल राहिलेल्या समाजाची सामाजिक व वैयक्तिक दु:खे शांताबाईसारख्या स्त्रीने हातात लेखणी घेऊन प्रथम मांडणे हे कांही कमी महत्वाचे नाही. कारण या आधी पुरुषांनी अनेक आत्मकथनातून या समाजाची दु:खे मांडलेली आहेतच पण स्त्रीने आपल्या व समाजाच्या व्यथा प्रथमच मांडलेल्या आहेत हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे. शांताबाईंनी मांडलेल्या अस्पृश्यांच्या वेदना जरी पूर्वी पुरुषांच्या आत्मकथनातून आलेल्या असल्या तरी शांताबाईंचे आत्मकथन अनेक कारणांनी वेगळे उतरले असल्याचे नमूद करुन प्रा.अरुण कांबळे म्हणतात" सगळीकडे दलित जीवनाचा अंत:पट तोच आहे - तीच - उपेक्षा - मानहानी, गुहा जीवन, नरकप्राय वेदनांचे जिणे ..... दलित स्त्रीचे जीवन म्हणजे तर दलितामधील दलित - गुलामांची गुलाम. या जीवनांच्या वाचनाने भारतीय स्त्रीची गुलामी दूर होण्यास, दालित्य दूर होण्यास थोडी जरी वाट मिळाली तरी हेही नसे थोडके असे म्हणावे लागेल." [४४] स्त्री व दलित स्त्री म्हणून भोगाव्या लागणाऱ्या सर्व यातना यांच्या वाट्याला आल्या पण या सर्वातून वाट काढून जीवन सफलतेकडे नेले. स्वत: बरोबर आपल्या वर्गाचीही प्रगती व्हावी यासाठी कष्ट घेतले. म्हणून" स्त्री मुक्ती लढ्यातील एक महत्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे आत्मचरित्र होय."[४५] हे कुसरे-कुलकर्णी यांचे विधान योग्य आहे. तेव्हा स्वत:च्या जीवनाच्या चितरकथेबरोबरच तत्कालिन सामाजिक विषमतेचे दर्शन शांताबाईंच्या या आत्मकथनातून होते. त्या अनुभवावर फारसे भाष्य करतानाही दिसत नाहीत. भूतकाळाच्या स्थितीबद्दल आत्मकरुणेचा सूरही कुठे उमटत नाही. मोजक्या शब्दात अनुभवाची चित्रे रेखाटली जातात - बारीक सारीक तपशिलांची

रंगरंगोटीची कुसर त्यात येत नाही. पण नेमक्या तपशिलातून केलेली ही रेखाटणी ती जीवनानुभव अचूक व्यक्त करतात" मोजक्या शब्दात सांगितलेले हे आत्मकथन आहे म्हणूनच "माझ्या जन्माची चित्रकथा " ही खरेच चित्रकथा बनते"[४६] स्वतःचे जीवन जगत असताना समाजाशी त्यांचा वैयक्तिक पातळीवरून मात्र सतत संघर्ष चालू आहे. तेव्हा मराठी आत्मचरित्रामध्ये दलित लेखकाच्या आत्मकथनातील अनुभव आणि त्यांची अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी आपला वेगळेपणा या आत्मकथनाने सिध्द केलेला आहे. त्यामुळेच शांताबाईंचे हे आत्मकथन अत्यंत मोलाचे ठरले आहे.

## संदर्भ सूची


१ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे - कुलकर्णी - दलित स्वकथने : साहित्यरूप, पृ.११७.
विजय प्रकाशन, सीताबर्डी - नागपूर
प्रथमावृत्ती ३ जानेवारी १९९१.

२ सौ.शांताबाई कृ.कांबळे - माझ्या जल्माची चित्तरकथा , प्रस्तावना
सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती,
६ डिसेंबर, १९९०.

३ - तत्रैव - पृ. २५.

४ - तत्रैव - पृ. ६.

५ - तत्रैव - पृ. ३५.

६ - तत्रैव - पृ. २८.

७ - तत्रैव - पृ. ४२.

८ - तत्रैव - पृ. ४२.

९ - तत्रैव - पृ. ६३.

१० - तत्रैव - पृ. ६५.

११ - तत्रैव - पृ. ६६.

१२ - तत्रैव - पृ. २६.

१३ - तत्रैव - पृ. ११२.

१४ - तत्रैव - पृ. ९६.

१५ ललित - समालोचन विशेषांक मे । जून - १९८७ - मौज प्रकाशन, मुंबई. पृ.६२.

१६ सौ.शांताबाई कृ.कांबळे - माज्या जल्माची चित्तरकथा, सुगावा प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती, ६ डिसेंबर,१९९०. पृ.७८.

१७ - तत्रैव - पृ.७९.

१८ - तत्रैव - पृ.७९.

१९ - तत्रैव - प्रस्तावना

२० - तत्रैव - पृ.८०.

२१ - तत्रैव - पृ.८९.

२२ - तत्रैव - पृ.८९.

२३ - तत्रैव - पृ.९०.

२४ - तत्रैव - पृ.९०.

२५ - तत्रैव - पृ.९२.

२६ - तत्रैव - पृ.९२.

२७ - तत्रैव - पृ.९२.

२८ - तत्रैव - पृ.९२.

२९ - तत्रैव - पृ.९९.

३० - तत्रैव - पृ.१०१.

३१ - तत्रैव - पृ.१०१.

३२ सौ.शांताबाई कृ.कांबळे - माज्या जल्माचीचित्तरकथा, पृ.१०२
सुगावा प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती,
६ डिसेंबर,१९९०.

३३ - तत्रैव - पृ.१०४.

३४ - तत्रैव - पृ.१०४.

३५ - तत्रैव - पृ.१०४.

३६ - तत्रैव - पृ.१०५.

३७ - तत्रैव - प्रस्तावना

३८ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे-कुलकर्णी-दलित स्वकथने : साहित्यरुप पृ.११७.
विजय प्रकाशन,सीताबर्डी,नागपूर,
प्रथमावृत्ती,३ जानेवारी,१९९१.

३९ सौ.शांताबाई कृ.कांबळे - उ.नि. पृ.१३३.

४० - तत्रैव - पृ.१४७.

४१ - तत्रैव - पृ.१६३.

४२ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे-कुलकर्णी - उ.नि. पृ.११७.

४३ बाळकृष्ण कवठेकर - दलित साहित्य एक आकलन पृ.८०.
प्रकाशक - श्री अनिलकुमार मेहता कोल्हापूर
प्रथमावृत्ती - जानेवारी,१९८१.

४४ सौ.शांताबाई कृ.कांबळे - उ.नि. प्रस्तावना.

४५ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे-कुलकर्णी - उ.नि. पृ.११७.

४६ संपा. वसंत दावतर - आलोचना - फेब्रुवारी १९८७ पृ. २६
सावरकर मार्ग, माहिम, मुंबई.

••